


# प्रीतिसंगम

www.pritisangam.com
सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर




वर्ष २९ वे | अंक २०२ | पाने ४ | रविवार | दि. ३१ ऑगस्ट २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

# शिंदे समिती आणि मनोज जरांगेंमधील चर्चा निष्फळ

## मनोज जरांगे पाटील यांची भूमिका: संभ्रम निर्माण करून राज्य अस्थिर करण्याचा प्रयत्न: आंदोलक आक्रमक होताच सुविधा सुरू

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेले आझाद मैदानातील आंदोलनात दुसऱ्या दिवशी कोणताही तोडगा निघाला नाही. त्यांच्या भेटीसाठी न्यायमुर्ती शिंदे समितीने भेट घेवून चर्चा केली. मात्र ही चर्चा फिस्कटली असून आधी जीआर..मग माघार अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली तर काल रात्री मुंबईत पडत असलेल्या पावसाने मराठा आंदोलकांचे मोठे हाल झाले याचा उद्रेक होवून आंदोलकांनी सीएसटी चौकातील रस्त्यावर उतरत हा रस्ता रोखून धरला, जोपर्यंत आम्हाला सुविधा पुरवल्या जात नाहीत तोपर्यंत आम्ही हलणार नाही. अशी भूमिका घेतल्याने पोलीसांनी चर्चेतून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला पण परिस्थिती बिकटच बनत चालली त्यानंतर पोलीसांनी केंद्रीय राखीव दलाच्या तुकड्या पाचारण केल्या. मात्र शेवटी मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलकांना पोलीसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आणि गुदमरलेली मुंबईची वाहतूक सुरू झाली. मनोज जरांगे पाटील आक्रमक होताच आंदोलकांना मुंबई महानगर पालिकेने तातडीने सुविधा पुरवण्यास सुरूवात केली. लाखों मराठा बांधव मुंबईतच तळ ठोकून आहेत तर त्यांच्या जेवणाची सोय अनेक ठिकाणाहून केली जात आहे. सरकार विरोधी मराठा आंदोलकांच्या मनामध्ये चिड निर्माण झाल्याचे पहायला मिळाले. मुंबईत आजही पाऊस सुरू असून आंदोलक पावसामध्ये ठिय्या मारून बसले आहेत. तर मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला तिसऱ्या दिवसाची परवाणगी देण्यात आली आहे. यावरून पोलीसांना सुनावले असून, रोज काय अर्ज करायचे, जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत उठणार नाही. असा इशारा दिला असून मुंबईत मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमिवर विनोद तावडे, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा केल्याचे समजते.



मराठा आंदोलकांनी आज सीएटी स्थानकासमोरी रस्त्यावर मांडला ठिय्या मारला.

## दोन समाज झुंजवणे योग्य नाही



कोणत्या राज्याला वाटत असेल की, आपल्या राज्यातील मोठा घटक असंतुष्ट राहावा, त्याच काय फायदा आहे. पण, एकाच्या संतुष्टीकरता दुसऱ्याला त्याच्यासमोर भांडणासाठी उभे करा, दुसऱ्याला असंतुष्ट करा हे आम्हाला मान्य नाही. राजकारण चुलीत गेले पण अशाप्रकारे समजा-समाजामध्ये तेढ निर्माण करणे हे आमच्या तत्त्वात कुठेही बसत नाही. म्हणून, सगळ्याचे समाधान कसे निघेल असा आमचा प्रयत्न आहे, ते संविधानाच्या चौकटीत बसवून काढावे लागेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

आपण कुणाला तरी आनंद देण्याची आज एखादी गोष्ट केली, तर उद्या अधिक जोराने त्याचा बॅकक्लॅश आपल्याकडे येईल, त्यामुळे संविधानाच्या चौकटीतून जे काही निर्णय करायचे आहे ते आपल्याला करायचे आहेत, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आरक्षणाच्या प्रश्नावर स्पष्टपणे भूमिका मांडली.

## मराठा आरक्षणासाठी घटना दुरूस्ती गरजेची



मराठा आरक्षणासाठी घटना दुरूस्त करणे आवश्यक आहे. केंद्र सरकाने धोरधात्मक निर्णय घेवून हे करावे. सुप्रीम कोर्टाने ५०-५२ टक्के आरक्षण मर्यादा घालून दिली असली तरी तमिळनाडू सारख्या राज्यात ७२ टक्के आरक्षण देता येवू शकते आणि ते सुप्रीम कोर्टात टिकले आहे. याचे उधाहरन देत शरद पवारांनी मराठा आरक्षणासाठी सरकारने ठोस पावले उचलावीत असे आवाहन केले.

## मनोज जरांगे परत का आले

मनोज जरांगे परत का आले हे एकनाथ शिंदेंनाच विचारा. मागच्या वेळी जेव्हा ते नवी मुंबईतून परत गेले होते तेव्हा हा प्रश्न त्यांनी सोडवल्याचे सांगितले होते. मग पुन्हा आंदोलन का उभे राहिले असे म्हणत राज ठाकरे यांनी शिंदेंनाच अप्रत्यक्ष जबाबदार धरले. **-राज ठाकरे**

मराठा आरक्षणासाठी कालपासून दाखल झालेल्या आंदोलकांना सुविधा मिळाल्या नसल्याने आंदोलक आक्रमक झाले होते. पावसात रात्र जागवत आंदोलकांनी काढली, सकाळी सीएसटी समोरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात आंदोलक जमले जोपर्यंत सुविधा होत नाहीत तोपर्यंत हलणार नाही असा पवित्रा घेत चक्क नाष्टा बनवण्याचे काम सुरू केले.पोलीस हतबल झाले आणि शेवटी जरांगेंनीच तोडगा काढला.

## आरक्षणाचा दुसरा दिवस

मराठ आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाला बसले आहेत. आज त्यांच्या उपोषणाचा दुसरा दिवस आहे. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने मराठा बांधव जमले आहेत. दुसरीकडे, सरकारने या प्रश्नावर चर्चेसाठी पुढाकार घेतला आहे. मराठा आरक्षणासाठीच्या शिंदे समितीचे प्रमुख, माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे, चर्चेसाठी आझाद मैदानात पोहोचले आहेत. मात्र, त्यांच्यासोबतची चर्चा निष्फळ ठरली तर पोलीसांनी पुन्हा एकदा एकाच दिवसाची मुदत वाढ दिली.

# साताऱ्याच्या गुन्हेगाराचा शिक्रापूर परिसरात एन्काउंटर

## सातारा शहर पोलिसांची थरारक कामगिरी,दुसरा आरोपी मात्र फरार

***सातारा/प्रतिनिधी:-***

पुणे जिल्ह्यातील शिक्रापूर परिसरात सातारा पोलिसांनी केलेल्या कारवाईत कुख्यात घरफोडी प्रकरणातील आरोपीचा एन्काऊंटर करण्यात आला आहे. लखन भोसले असे मृत आरोपीचे नाव असून तो अनेक घरफोडी आणि गंभीर गुन्ह्यांमध्ये पोलिसांच्या वॉन्टेड लिस्टमध्ये आहे या कारवाईत दुसरा एक आरोपी अंधाराचा फायदा घेत पसार होण्यात यशस्वी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिक्रापूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून घरफोड्यांच्या घटना वाढल्या होत्या. या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर सातारा पोलिसांनी विशेष पथक तयार करून तपास सुरू केला. पोलिसांना गुप्त माहितीच्या आधारे शिक्रापूरजवळ संशयित आरोपी लखन भोसले आणि त्याचा साथीदार या भागात असल्याची टीप पोलिसांना मिळाली.

खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीनंतर पोलिसांनी तातडीने सापळा रचला. दरम्यान, पोलिसांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी शस्त्रासह पोलिसांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. आत्मसंरक्षणासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात लखन भोसले जागीच ठार झाला. मात्र त्याचा दुसरा साथीदार घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी झाला असून त्याच्या शोधासाठी पोलिसांनी मोठी शोधमोहीम हाती घेतली आहे.

लखन भोसले याच्यावर सातारा, सांगली, पुणे आणि इतर काही जिल्ह्यांत घरफोडी, दरोडे,



चोरी, मारहाण अशा गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. गुन्हेगारी जगतात त्याची दहशत होती. सातारा पोलिसांनी केलेली ही कारवाई केल्याचे पोलिस विभागाकडून सांगण्यात येत आहे. या घटनेनंतर शिक्रापूर परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. दुसरा आरोपी अद्याप फरार असून त्याला लवकरच गजाआड केले जाईल, असा विश्वास पोलिस अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

### मध्यरात्री थरार

दोन दिवसापूर्वी महिलेच्या गळ्यातील चेन चोरी करून लखन भोसले फरार झाला होता. चाकूचा धाक दाखवून महिलेच्या गळ्यातील दागिने चोरी करतानाची घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. फरार झालेल्या लखन भोसले या आरोपीला शोधण्यासाठी सातारा पोलिसांचे पथक शिक्रापूर येथे गेले होते. लखन भोसलेला अटक करण्यासाठी गेलेल्या चार पोलिसांवर त्याने हल्ला केला. या हल्ल्यात चार पोलीस गंभीर जखमी झाले. आरोपी लखन भोसले हा खटाव तालुक्यातील जयराम स्वामी वडगाव येथील आहे.

# परागंदा झालेला अट्टल गुन्हेगार पोलिसांच्या ताब्यात

## १८ लाख रुपये किमतीचे अठरा तोळे दागिने पोलिसांकडून हस्तगत

***सातारा/प्रतिनिधी:-***

तब्बल एक वर्षापासून सातारा शहरातून परागंदा झालेला व सातारा शहरात घरफोड्या करणारा अट्टल गुन्हेगार जीवन शहाजी रावते वय २७ राहणार दत्तनगर कोडोली याला सातारा शहर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने सातारा औद्योगिक वसाहतीत सापळा रचून पकडले .त्याच्याकडून १८ लाख रुपये किमतीचे १८ तोळे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

रावते याने सातारा शहर हद्दीत डिफेन्स कॉलनी विकास नगर व सातारा शहरातील कोडोली येथे तीन ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिली .याच्यावर सातारा शहर पोलीस स्टेशन अंतर्गत घरफोडीचे तब्बल १३ गुन्हे दाखल आहेत .पोलीस अधीक्षक तुषार दोषी यांनी सातारा शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र मस्के यांना घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण शाखा विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शाम काळे पोलीस उपनिरीक्षक सुधीर मोरे सुधीर भोसले निलेश जाधव निलेश यादव या पथकाने पेट्रोलिंग आणि बंदोबस्त यावर भर दिला होता डीबी पथकाला एमआयडीसी परिसरामध्ये जीवन रायते हा एक वर्षापासून परागंदा असलेला आरोपी आल्याची पक्की माहिती मिळाली त्यांनी एमआयडीसीच्या विशिष्ट परिसरात सापळा रचून त्याला ताब्यात घेतले सुरुवातीला त्यांनी उडवा उडवीचे उत्तर दिले त्यानंतर आरोपीस विश्वासात घेऊन त्याकडे अधिक कौशल्यपूर्ण तपास करण्यात आला तेव्हा त्याने शहर हद्दीमध्ये जून महिन्यात सातारा शहर डिफेन्स कॉलनी आणि विकास नगर येथे तीन ठिकाणी दागिन्यांची चोरी केल्याची कबुली दिली .संबंधित आरोपीला अधिक गुन्हे उघडकीस आणण्याच्या दृष्टीने विचारपूस केली जात आहे.

निलेश यादव विक्रम माने पंकज मोहिते तुषार भोसले सुहास कदम सचिन रिटे संतोष घाडगे सागर गायकवाड विशाल धुमाळ मच्छिंद्रनाथ माने सुशांत कदम यांनी या तपासात भाग घेतला होता

# जवान आदित्य थोरात अनंतात विलीन

## कालवडेसह परिसरावर शोककळा

***कराड/प्रतिनिधी:-***

तालुक्यातील कालवडे गावचा सुपुत्र आणि भारतीय सैन्याचा लान्स नायक आदित्य थोरात (वय २६) यांचे आकस्मिक निधन झाल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. देशसेवेत अखंड निष्ठा आणि शौर्याने कार्यरत राहिलेला हा जवान अचानक अनंतात विलीन झाल्याने ग्रामस्थांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

आदित्य थोरात गेल्या दहा वर्षांपासून भारतीय सैन्यात कार्यरत होते. सिक्कीम येथील आर्मी सप्लायर कोर बटालियनमध्ये त्यांनी जबाबदारीने सेवा बजावली. सेवेदरम्यान त्यांची प्रकृती अचानक बिघडली व उपचारांपूर्वीच त्यांची प्राणज्योत



मालवली, अशी माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी दिली.

त्यांचे पार्थिव शनिवारी सकाळी मूळगावी कालवडे येथे आणण्यात



आले. या वेळी संपूर्ण गावाने अश्रुपूर्ण डोळ्यांनी आपल्या वीरपुत्राचे स्वागत केले. नातेवाईक, मित्रपरिवार, शेजारी, मान्यवर आणि गावकरी मोठ्या संख्येने अंतिम दर्शनासाठी हजर होते. वीर जवान अमर रहे!, भारत माता की जय! अशा घोषणांनी गावाच्या वातावरणात हळव्या भावना दाटून आल्या होत्या.

यानंतर सकाळी नऊच्या सुमारास कालवडे स्मशानभूमीत लष्करी सन्मानाने त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

पान ४ वर

### उत्सव खरा..

कनिष्ठा जेष्ठा गौराई
सोनपाऊले आल्या
भक्त करती स्वागत
भक्ती रसात न्हाल्या
विघ्नहर्ता स्थानापन्न
संगती देवी शोभल्या
गजबजले अवघे घर
माहेरवाशीण भल्या
शुचिर्भूत तन न् मन
गृहिणी सुखे नटल्या
निमीत्ते आप इष्टांना
स्नेह भराने भेटल्या
सजावटी नयन रम्य
वाव लाभला कलेला
रे पक्कांन्नेअन्नपूर्णेची
तृप्त जाहला भुकेला
भजन किर्तन स्त्रोत्र
गौराई अश्या रमल्या
जाणीव ठेवा जराशी
गृहिणी खूप दमल्या
गृह चारिणी सन्मान
दाद द्यावी कौशल्या
जशी रामायणास्तुत्य
श्रेष्ठ माता कौसल्या
मान सन्मान जपावा
गृहलक्ष्मीचाआपल्या
आनंदे उत्सव सांगता
होईल गृहस्था भल्या

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# गौराईच्या गोड तिखट नैवेद्यासाठी सजली दुकाने

## करंजीपासून लाडूपर्यंत,बर्फीपासून शंकरपाळीपर्यंत विविध प्रकारचे चिवडे फरसाण,शेव उपलब्ध

***सातारा/प्रतिनिधी:-***

सोनपावलांनी येणाऱ्या गौराईला गोड नैवेद्य व्हावा, यासाठी महिलांनी विविध पदार्थ तयार करण्यासाठी कंबर कसली आहे. महिलांच्या मदतीला मिठाईवाले सरसावले असून, तयार पदार्थांनी दुकाने भरून गेली आहेत. करंजीपासून ते बुंदीच्या लाडूपर्यंत आणि बर्फीपासून शंकरपाळीपर्यंतचे पदार्थ विक्रीस मांडले जात आहेत. गौरीच्या सजावटीत लक्ष वेधण्यासाठी दोन किलोचा मोदकही बाजारपेठेत उपलब्ध आहे.

गणपतीपाठोपाठ रविवारीगौराईचे आगमन होणार आहे. ही गौराई सुंदर असावी, तिला सजवावी आणि तिच्या पाहुणचारात कोणतीही कमी राहू नये, यासाठी महिलांचागौरीच्या आटापिटा चाललेला असतो. गणपती आगमनापूर्वीपासूनच फराळाची महिला तयारी सुरू करतात. आता गौराई रविवारीच येणार असल्याने महिलांची घरोघरी फराळाचे पदार्थ करण्याची धांदल उडाली आहे. अनेक महिला पदार्थ घरीच करतात. मात्र, अनेक नोकरदार उद्योजक महिलांना वेळ पुरेसा मिळत नाही. त्यामुळे त्यांना बाजारातील तयार पदार्थांवर अवलंबून राहावे लागते. या महिलांची ही गरज पूर्ण करण्यासाठी गेली अनेक वर्षे बाजारपेठेत अगदी दर्जेदार फराळाचे पदार्थ तयार मिळतात. आता जेवढे होईल तेवढे घरी करायचे आणि राहिलेले विकत आणायचे, असा फंडाही सुरू आहे. त्यामुळे गौरीसाठी तयार पदार्थ, मिठाई घेण्यासाठी दुकानांमध्ये वर्दळ वाढली आहे. गौरी सजावटीत फराळात ठेवण्यासाठी दोन किलो वजनाचा मोदकही उपलब्ध आहे.

दरम्यान, साताऱ्यात पोवई नाका, राजपथ, कर्मवीर भाऊराव पाटील पथ, मोती चौक अशा विविध ठिकाणच्यामिठाई विक्रीच्या दुकानांबरोबरच हातगाड्यांवरही फराळाच्या पदार्थांची विक्री सुरू



आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत खाद्यतेल, कच्च्या मालाच्या दरात वाढ झाली आहे. तरीही तयार पदार्थांच्या दरात फारशी वाढ झाली नसल्याचे योगेश स्वीट्सचे योगेश मोदी यांनी सांगितले.

### फराळाच्या पदार्थांचे सर्वसाधारण दर (प्रतिकिलो रुपयांत)

बुंदी लाडू : ३६० ते ६००, रवा लाडू : ४८० ते ५६०, बेसन लाडू: ५२०, करंजी : ४८०, चिवडा : ३२९, फरसाण : ३२०, शंकरपाळी ३२०, चकली : ३२०, गुलाबजाम : ४८०, आंबा बर्फी : ८००, माव्याचे मोदक : ६००, बाकरवडी : ३२०, दोन किलो वजनाचा फ्लेवरचा मोदक: १६०० रुपये, दोन किलो वजनाचा माव्याचा मोदक १२०० रुपये.

# मराठ्यांची आंदोलन आणि सरकारची भूमिका

गेली अनेक वर्ष मराठा आरक्षणासाठी राज्यात विविध आंदोलने झाली मात्र मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांचे जे आंदोलन उभे राहिले ते आंदोलन आता निर्णय वळणावरून ठेपले आहे. गत वेळी नवी मुंबईतून परतलेले हे भगवे वादळ आता आझाद मैदानात पोचले आहे. खरे तर राज्य शासनाने मनोज जरांगे पाटील यांना गांभिर्याने न घेता हलक्यात घेतले. गणेशोत्सवाच्या काळात आणि भर पावसात सुरू असलेल्या या मोर्चाने राज्याच्या समिकर्नांना आवाहन देत शासनाने आखलेल्या योजनांचा बोजवारा उडवत लाखोंच्या संख्येने मुंबईच्या संख्यने मुंईचे रस्ते, मैदाने आणि सार्वजनिक ठिकाणे व्यापली. भरपावसामध्ये या आंदोलकांना सुविधा न पुरवण्याचा उद्रेकही आज पहायला मिळाला, तब्बल चार तास रस्ता रोखून धरत मुंबईचा श्वास गुदमरला.सरकारने आपल्या धोरणात सुधारणा केल्या नाहीत तर हे वातावरण चिघळले जावू शकते. आणि या रोशाला देवेंद्र फडणवीस यांना सामोरे जावे लागेल. स्वसमर्थक याचा फायदा उठवतील अशी भूमिका आता सरकारची राहू नये.



**प्रीतिसंगमावरून**

शासनाने सुरुवातीला जरांगे यांच्या प्रभावाचे चुकीचे मोजमाप केले. लोकसभा निवडणुकीत जरांगेचा फॅक्टर दिसला तरी विधानसभा पातळीवर त्यांनी स्पष्ट भूमिका न घेतल्याने काही नेत्यांना ते त्यांच्या आंदोलनाचे अपयश वाटले. या चुकीच्या गृहितकावरून पर्यायी नेतृत्व घडवण्याच्या, फोडाफोडीच्या प्रयत्नांना संधी मिळाली, पण हे प्रयत्न अपयशी ठरले. बीडमधील मस्साजोग प्रकरणानंतर जरांगे यांच्याशी स्पर्धा लवण्याचा प्रयत्न झाला; तरीही विश्वासार्हता आणि साधेपणा यांच्या जोरावर जरांगेंचा ठसा कायम राहिला. मराठा समाजाचा न्याय आणि आर्थिक सुरक्षितता. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर समाजात निर्माण झालेले वातावरण ही यामागील कारणे आहेतच.-लाखो गरजू लोकांनी मुंबईत उपस्थिती दर्शवून शासनाला हा संकेत दिला की समस्येची गंभीरता सूक्ष्म नाही. आतापर्यंत ज्या पद्धतीने त्या आंदोलनाला घुमवत आले तसे आता यापुढे होणार नाही. मुंबईकाही ठिकाणी आंदोलकांनी तातडीने कोंडी झालेले मार्ग मोकळे करून मुंबईकरांना आपल्या सोबत जोडण्याचा प्रयत्न केला, अनुशासन दाखवले. परंतु शासनाने संवादाऐवजी वेळ काढू पण केला. यात सरकारची भूमिका आणि तिची चूक स्पष्ट दिसली. उपसमितीची निवड आणि तिच्या नेतृत्वाची अयोग्य निवड या प्रकरणात निर्णायक ठरल्या. पूर्वी चंद्रकांतदादा पाटील यांचे संवादकौशल्य उपयुक्त ठरले असते; परंतु सध्याच्या समितीने वेळीच आणि संवेदनशीलतेने चर्चा सुरू ठेवली नाही. समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांना जरांगे यांच्या जवळच्या कार्यकर्त्यांनी प्रतिसाद दिला नाही म्हणून त्यांच्याशी मुंबईत आल्यावर बोलू असे स्वतःहून ठरवले यामागे हे आंदोलन पेटून फडणवीसंना त्रास करण्याचा हेतू आहे की काय अशी शंका वाटावी इतक्या सहजतेने त्यांनी हे प्रकरण हाताळले. काही नेत्यांनी आंदोलनाला हलके घेऊन वादग्रस्त सार्वजनिक वक्तव्ये करून इंधन घातले, ज्यामुळे बहुतेक वेळेस सरकारची छबी खराब झाली. मुख्यमंत्री संयमी राहिले, तरी मंत्रीवर्गातील विसंवाद आणि विरोधाभासी वक्तव्यांनी परिस्थिती अधिक तणावग्रस्त केले.

कायदेशीर अडथळे आणि आरक्षणाची मर्यादा ही मुख्य अडचण आहे. ५० टक्के असे सर्वोच्च न्यायालयाचा तत्त्व मराठा मागणीसमोरील मोठे आव्हान बनले आहे. पूर्वी विरोधी पक्ष नेते असताना फडणवीस यांनी ही मर्यादा वाढवण्याबाबत वक्तव्य केले होते, त्या धर्तीवर विचार करता आज सरकारकडे फक्त राजकीय उपायच उपलब्ध आहेत. शरद पवारांसह विरोधकांनी केंद्रीय घटनादुरुस्तीबद्दल लक्ष वेदले होते. मात्र फडणवीस सरकारला आपण आरक्षण दिल्याचा आणि ते हायकोर्टात टिकल्याचा जितका अभिमान होता तितका तो सर्वोच्च न्यायालयात फेटाळला गेल्यानंतर जनतेच्या मनात राहिला नाही. या संदर्भात काही तातडीचे पर्याय शासनासमोर आहेत. न्यायमूर्ती शिंदे यांनी जी समिती स्थापन केली तिची व्याप्ती वाढवून ओबीसीमधून मराठा समाजाच्या अंतर्भावाबाबत शिफारसी होऊ शकतात. प्रांताधिकारी स्तरावर कुणबी दाखल्यांसंबंधी अडथळे दूर करून गावोगावी असलेल्या कुणबी नोंदींचा आधार घेत जात पडताळणी करण्यात येऊ शकते. हैदराबाद गॅझेट आणि स्थानिक अभिलेखांच्या आधारे प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया सुलभ करणे हा एक व्यवहार्य उपाय ठरू शकेल. परंतु समस्या केवळ प्रशासकीय नसून राजकीय आहे. अनेक आमदार, मंत्री आणि पक्षकार या आंदोलनाच्या दिशेने गुप्तपणे वळले आहेत, ज्यामुळे सरकारच्या धोरणात अंतर्गत विसंगती दिसते. विरोधकांचे आचरण आणि सत्ताधाऱ्यांच्या आतले भिन्न मत हे आंदोलन वाढवण्यास कारणीभूत ठरतात. त्यामुळे सरकारने स्वप्रेरितपणे भूमिका स्थिर करणे आवश्यक आहे; विरोधकांकडे बोट दाखवून काम चालणार नाही.

मुंबईत झालेली लाखोंची उपस्थिती आणि आंदोलनाचे सक्षम नेतृत्व ही दोन्ही बाबी सरकारसाठी स्पष्ट इशारा आहेत. समाजाची संवेदना, आर्थिक चिन्हे आणि न्यायाची मागणी यांचा संगम आहे. शासनाने तातडीने संवाद सुरू करून, शिंदे समितीची भूमिका तपासून, जात पडताळणीसंबंधी अडथळे काढून आणि कुणबी दाखल्यांवर सुलभता आणून हे प्रश्न हाताळावे. अन्यथा या आंदोलनाचे परिणाम पुढील राजकीय आणि सामाजिक चढउतारात दिसून येतील. परिस्थिती हाताबाहेर जाण्याआधी निर्णय घेणे सर्वांसाठी हितकारक ठरेल. सरकारने तातडीने प्रशासकीय तसेच राजकीय पावले उचलली पाहिजेत. पहिल्यांदा प्रभावी संवादासाठी केंद्रस्थानी आणि जिल्हा पातळ्यांवर खुली चर्चा आयोजित करावी; त्यात समाज प्रतिनिधींना, तज्ज्ञांना आणि प्रशासकीय अधिकारी यांना समाविष्ट करावे. दुसरे म्हणजे, शिंदे समितीकडून वेळेत शिफारशी घेऊन आलेल्या शिफारसींवर तात्काळ कार्यवाहीची रुपरेषा आखावी आणि ती सार्वजनिकपणे जाहीर करावी, ज्याने आंदोलनाला थोडे मनोधैर्य मिळेल. तात्पुरती आर्थिक मदत, रोजगार, शेतकरी कर्ज माफीची मुदत पुनरावलोकन आणि कौशल्य विकासाच्या कार्यक्रमांसह एक समग्र पॅकेज आखण्याची आणि त्यावर जरांगे यांना राजी करण्याची जबाबदारी योग्य व्यक्तींवर सोपवावी लागेल. भूमी व नोंदणी संदर्भात तांत्रिक कामे त्वरीत पूर्ण करावी; गावोगावी कुणबी नोंदींचे केवळ सूचीकरण न करता त्यावर आधारीत प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरळीत करावी. असे केल्याने न्यायालयीन अडचणींना वेळ मिळेल आणि अर्थसंकल्पीय मदत करता येईल.

शेवटी, राजकीय मॅच्युरिटीची गरज अधोरेखित होते. विरोधकांनीही मुद्द्याला राजकीय खेळ बनवण्याऐवजी संयुक्त बैठकीद्वारे तोडगा काढण्यास भागीदारी करावी. मुंबईकरांनीही या संकटाला मानवदृष्टीने पाहून तात्पुरती गैरसोय मान्य करावी; हे परिवर्तन केवळ कायदेशीर उपायांनी नव्हे तर सामाजिक समझुतीनेही साधता येईल. शासनाने वेळ न घालवता सकारात्मक आणि व्यवहार्य तोडगा आखला नाही, तर या आंदोलनाचे दिर्घकालीन परिणाम समाज व राजकारणावर टिकून राहतील. सरकारने जलद निर्णय घेतले नाही तर आंदोलन अधिक व्यापक स्वरूप घेऊ शकते. त्यामुळे तातडीचे कायदेशीर व प्रशासकीय उपाय, खुली चर्चा आणि पारदर्शक वेळापत्रक जाहीर करणे हा सगळ्यात प्रभावी आणि सुरक्षित मार्ग ठरेल. समर्पक संवाद, न्याय्य उपाय आणि वेळबद्ध अंमलबजावणी हेच संकटातून बाहेर पडण्यासाठी मार्ग आहेत.श्र

## मराठा समाजातून उद्योजक निर्मितीसाठी

# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांचे योगदान महत्वपूर्ण

**वर्षा पाटोळे**
**जिल्हा माहिती अधिकारी सातारा**

राज्यात आर्थिकदृष्टया मागास असलेल्या घटकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या समाजाचा सामाजिक विकास करणे, विशेष करुन या समाजातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांकरीता रोजगार संधी उपलब्ध करुन देण्याकरीता, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या विकासाकरीता स्थापन करण्यात आलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१८ मध्ये आर्थिक महामंडळ पुर्नजिवीत केले, मराठा समाजातील युवकांना उद्योजक निर्माण करण्यासाठी महामंडळामार्फत विविध योजना जाहिर केल्या. महामंडळाकरिता शासनाने जाहिर केलेल्या विविध योजनांची अमंलबजावणी होण्यारिता कै. आमदार अण्णासाहेब पाटील यांचे सुपुत्र नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांची महामंडळाच्या अध्यक्षपदी नेमणुक केली व या पदाला कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा दिला.

त्यांनी या महामंडळाच्या योजनांचा मराठा समाजातील युवकांना लाभ मिळवून देवून देण्यासाठी महामंडळ गतिमान केले. आजच्या घडीला या महामंडळाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील एक लाख मराठा युवकांना उद्योजक करण्यात आले आहे.

महामंडळाच्या योजनांची संपूर्ण यंत्रणा व कार्यपध्दती ही ऑनलाईन असून पूर्णपणे पारदर्शक आहे. सदर योजना ही लाभार्थीभिमुख असून लाभार्थी जोपर्यंत सर्व माहिती वेब प्रणालीवर (www.udyog.mahaswayam. gov.in.) अपलोड करीत नाही, तोपर्यंत पुढील कार्यवाही करता येत नाही.

**महामंडळाच्या योजनांकरीता सामाईक अटी व शर्ती**

उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य. या योजना प्रामुख्याने मराठा प्रवर्गाकरीता तथा ज्या प्रवर्गाकरीता स्वतंत्र महामंडळ अस्तित्त्वात नाही, अशांकरीता आहेत. योजनेकरीताची वयोमर्यादेची अट स्त्री-पुरुषांकरीता कमाल ६० वर्षे असेल. लाभार्थ्याचे कौटूंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखाच्या आत असावे. (जे रु. ८ लाखाच्या मर्यादित असल्याचे तहसिलदाराचे प्रमाणपत्र) किवा वैयक्तीक I.T.R. (पती व पत्नीचे) ५. लाभार्थ्याने महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रात स्थायिक / कार्यरत असलेल्या बँकेकडून कर्ज घेणे अनिवार्य असेल. दिव्यांग व्यक्तीला योजनेअंतर्गत लाभ घ्यावयाचा असल्यास तो मानसिक दृष्ट्या सक्षम असावा.

गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) मध्ये कमाल वयोमयदिचे बंधन नसेल. गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) अंतर्गत भागीदारी संस्था , सहकारी संस्था बचत गट, ( एन.एल.पी. कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट संस्था लाभास पात्र असतील. महामंडळाच्या योजनांतर्गत फक्त व्यवसाय, उद्योगाकरीता घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा करण्यात येईल व या योजनांची अंमलबजावणी तंतोतंत शासन निर्णय क्र. अपाम २०१७/प्र.क्र.१८७/रोस्वरो-१, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ नुसार करण्यात येईल.

महामंडळाच्या योजनांची माहिती

**वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजना (IR-१)**

या योजनेची मर्यादा रु. १० लाखाहून रु १५ लाखापर्यंत वाढविण्यात आलेली असून, महामंडळामार्फत १४.५ लाखाच्या व्याज मर्यादित परतावा करण्यात येईल. सदर व्याज परतावा कालावधी जास्तीत-जास्त ७ वर्ष व व्याजाचा दर जास्तीत-जास्त द.सा.द.शे. १२% असेल. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांनी मात्र बँकेमार्फत कर्ज घेतलेले असावे व ते फक्त व्यवसायिक तथा उद्योगाच्या दृष्टीने मंजूर झालेले असावे.

(टिप मात्र दिनाक २० मे, २०२२ पूर्वीच्या LOI धारकांना नियमानुसार रु १० लाखाच्या मर्यादितील व्याज परतावा करण्यात येणार असून त्याकरीता रु. ३ लाखाची मर्यादा असेल.)

**गट प्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना (IR-२)**

या योजनेअंतर्गत किमान दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तीच्या गटाने एकत्र येऊन,दोन व्यक्तीसाठी कमाल रु. २५ लाखाच्या मार्यादेवर, तीन व्यक्तीसाठी रु ३५ लाखाच्या मर्यादेवर चार व्यक्तीसाठी ४५ लाखाच्या मयोदेवर व पाच पेक्षा अधिक व्यक्ती असल्यास ५० लाखापर्यतच्या व्यवसाय/ उद्योग कर्जावर ५ वर्षापर्यंत अथवा कर्ज कालावधी यापैकी जे कमी असेल ते जास्तीत जास्त १२ टक्के व्याज किंवा रु. १५ लाखाच्या मयदेत कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत हप्ते भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम गटाच्या बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल.

या योजनेमध्ये FPO गटांनी त्यांच्या शेतीपूरक व्यवसायाकरिता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील देखील व्याज परतावा महामंडळ करेल. या योजनांचा लाभ घेण्यासाठी खालील कार्यपध्दती अत्यंत महत्वाची असून याच पध्दतीचा अवलंब करावा.

**पात्रता प्रमाणपत्र (ङजख) करीता महत्वाची कागदपत्रे -**

आधार कार्ड (अपडेटेड मोबाईल क्रमांक व स्वतःच्या ई-मेल आयडी सह) रहिवासी पुरावा: (रहिवासी दाखला, लाईट बिल , रेशनकार्ड, गॅस बिल, बैंक पासबुक उत्पनाचा पुरावा : (उत्पन्नाचा दाखला, आयटी रिटर्न (जर लग्न झाले असल्यास नवरा-बायकोचे व लग्न झाले नसल्यास स्वत चे आयटी रिटर्न अनिवार्य) जातीचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला एक पानी प्रकल्प अहवाल. (याचा नमुना वेब प्रणालीवर उपलब्ध आहे.) पात्रता प्रमाणपत्र (LOI) प्राप्त झाल्यानंतरच, ङजख समवेत लाभार्थ्याने त्याला करावयाचा असलेल्या व्यवसायाचा /उद्योगाचा प्रकल्प अहवाल (आवश्यक ते सर्व कागदपत्र) घेऊन त्याच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही बँकेमध्ये कर्ज प्रकरण दाखल करावे, कर्ज मंजुरीची पुर्ण प्रक्रीया बँक त्यांच्या नियमानुसार करीत असते, यामध्ये महामंडळ कोणत्याही स्वरुपाचा हस्तक्षेप करीत नाही. कर्ज प्रकरण दाखल केल्यानंतर पोचपावती बँकेकडून घ्यावी.) बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतर कर्ज मंजूरीबाबतची आवश्यक सर्व माहिती संबंधिताने वेब प्रणालीवर सादर करावी. (उदा. ज्या खात्यामध्ये व्याज परतावा हवा आहे त्याचा तपशील, बँक कर्ज मंजुरी पत्र, बँकेमार्फत वितरीत करण्यात आलेल्या कर्जाचा पुरावा (बँक स्टेटमेंट), बँक एचख वेळापत्रक (त्यावर वसुलीचा दिनांक असणे अनिवार्य), प्रकल्प अहवाल, हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा (बैंक स्टेटमेंट सही व शिक्क्यानिशी) त्यानंतर बँकेमध्ये पुर्ण एचख हफ्ता विहित कालमर्यादेत भरल्यानंतरच महामंडळाच्या वेब प्रणालीवर ऑनलाईन क्लेम दाखल करावा. दाखल केलेला क्लेम अचूक असला तरच संबंधिताला व्याज परताव्याचा लाभ देता येईल. यामध्ये हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा म्हणून बैंक स्टेटमेंट सही व शिक्क्यानिशी अपलोड करणे अनिवार्य असेल. (इ) लाभार्थ्याने दाखल केलेल्या क्लेमची पडताळणी महामंडळामार्फत करण्यात येऊन, लाभार्थ्यांस अनुज्ञेय असलेली व्याज परताव्याची रक्कम संबंधिताच्या बैंक खात्यात ऑनलाईन स्वरुपात वितरीत करण्यात येईल. या योजनांच्या लाभाकरीता कोणत्याही सहकार्याची आवश्यकता असल्यास महामंडळाच्या जिल्हा समन्वयकांना संपर्क साधावा. जिल्हा समन्वयकांचा संपर्क वेब प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**(सिविल (उखइखङ)*-**

सिबिल स्कोअर बँकिंग किंवा वित्तीय संस्थांमध्ये खूपच महत्वाचा मानला जातो. सिबिल स्कोअर हा तुमच्या क्रेडिट हिस्ट्री दर्शवतो आणि याच स्कोअरच्या आधारावर तुम्हाला कर्ज किंवा क्रेडिट कार्ड देण्यात येते. जाणून घ्या सिविल स्कोअर म्हणजे नेमके काय?

सिबिल स्कोर हा ३०० ते ९०० च्या दरम्यान गणला जातो.३०० हा सर्वात कमी तर ९०० हा सर्वात चांगला सिबिल स्कोर असल्याच दर्शवतो. तुम्ही कर्जाची परतफेड किवा क्रेडिट कार्ड पेमेंट योग्य वेळेत केले पाहिजे. बॅकिंग किंवा वित्तीय संस्थामध्ये सिबील स्कोरला खुपच महत्व आहे. गृह कर्ज, वाहन कर्ज, वैयक्तीक कर्ज, क्रेडीट कार्ड घ्यायचे असल्यास बँकाकडुन सिबिल स्कोर तपासला जातो. ७५० किंवा त्यापेक्षा अधिक सिबिल स्कोर चागंला मानला जातो. जर आपला सिबिल स्कोर ७५० पेक्षा कमी असेल तर आपल्याला बँका किंवा एनबीफसी यांच्याकडुन कर्ज घेण्यास अडचणी येतात.

*सिबिल स्कोअर वाढवण्यासाठी काय करावे? जर एखादं कर्ज घेतलं असेल किंवा केडिट कार्डचा वापर केला असेल तर त्याचा हप्ता वेळेवर भरा. वेळेवर हप्ता भरल्यास तुमचा सिबिल स्कोअर सुधारण्यास मदत होते.

***सिबिल स्कोअर सुधारण्यासाठी काही महत्वाच्या टिप्स***

आपल्या सिबिल स्कोरचे परिक्षण करा. सिबिल स्कोर हा चांगला असल्यास तुम्हाला आवश्यक असलेले कर्ज मजुंर होण्यास मदत होते. *मर्यादित वापर - आपल्या क्रेडीट मर्यादेपेक्षा जास्त खर्च करु नये. आणि त्याची खात्री करुन घ्यावी. जर तुम्हाला सिबिल स्कोर ७५० पर्यंत ठेवायचा असेल तर आपल्या क्रेडीट मर्यादेच्या ५० टक्क्यांहुन अधिक खर्च करणे टाळा.

वेळेवर देयके- चांगला सिबिल स्कोर ठेवण्यासाठी वेळेवर कर्जाचे किंवा क्रेडिट कार्डचे हफ्ते भरा. उशीरा पेमेंट टाळा.अन्यथा त्याचा परिणाम तुमच्या सिबिल स्कोरवर होतो.

# कराडचा कन्यागत उत्सव:धर्म,संस्कृती आणि पर्यावरणाचा संगम

**डॉ.विनायकशास्त्री गरुड (गुरुजी)**
**कराड**

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात वसलेले कराड (पूर्वीचे करहाटक) हे एक ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे शहर आहे. सह्याद्रीतील ब्रह्मगिरी शिखरावर वसलेल्या प्राचीन महाबळेश्वर या तीर्थक्षेत्री कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री आणि गायत्री या पाच गंगारुपी भगिनींचा उगम होतो. यातील कृष्णा आणि कोयना या दोन पवित्र नद्यांचा कराड येथे संगम होतो, ज्याला प्रीतिसंगम किंवा प्रतीक्षेत्रस्नान असेही म्हटले जाते. याच संगमावर मोठ्या भक्तिभावाने पारंपरिक कन्यागत पर्व उत्सव साजरा केला जातो. या पर्वकाळात कराडला धार्मिक आणि अध्यात्मिक महत्त्व प्राप्त होते. कृष्णा नदीच्या किनारी असलेली ही जागा पर्यावरणीयदृष्ट्या देखील अतिशय संवेदनशील आणि तितकीच महत्त्वाची आहे.

कन्यागत पर्वकाळाचे धार्मिक महत्त्व खूप अनन्यसाधारण आहे. कन्यागत पर्व म्हणजे, कन्यागत पर्व श्रावण महिन्यात, विशेषतः श्रावण शुद्ध एकादशीपासून ते पौर्णिमेपर्यंत साजरे होते. तसेच वर्षभराच्या काळात विविध धार्मिक विधी, पूजाअर्चा आणि गंगापूजन केले जाते. कन्यागत हा कालखंड विशेषतः स्त्रियांसाठी महत्त्वाचा मानला जातो. या काळात कन्या म्हणजेच देवींचे आगमन पृथ्वीवर होते असे मानले जाते, त्यामुळे स्त्रिया विविध देवतांची आराधना करून घरातील व कुटुंबातील कल्याणासाठी प्रार्थना करतात.

कराडच्या कृष्णा-कोयना नद्यांच्या संगमावर कन्यागत पर्वकाळात हजारो भक्त एकत्र येतात. कृष्णामाई देवीचा उत्सव, संगमात स्नान, देवी पूजन आणि कन्यागतींचे स्वागत आदी धार्मिक विधी पार पडतात. स्थानिक पुरोहितांच्या मार्गदर्शनाखाली यज्ञ, होम, अभिषेक यांसारखे विधी पार पडतात. या पर्वाच्या निमित्ताने समाजातील सर्व स्तरातील लोक एकत्र येतात. यावेळी सामूहिक पूजा, कीर्तन, प्रवचन आणि हरिपाठांचे आयोजन होत असल्याने समाजात एकात्मता आणि धार्मिक एकता जाणवते. तसेच कृष्णामाईला साडी नेसवली जाते. या धार्मिक विधीवेळी महिला, युवतींची मोठी गर्दी असते.

कृष्णा नदी गोदावरी व कावेरी यांच्या दरम्यान वाहणारी ही नदी सुमारे १२८० किमी प्रवास करून बंगालच्या उपसागराला मिळते. उगमापासून महाराष्ट्रातील ३०० किमी प्रवासात तिला वेण्णा, कोयना, वारणा, पंचगंगा, दूधगंगा अशा प्रमुख उपनद्या मिळतात. सांगलीजवळील नृसिंहवाडी दत्तक्षेत्र, तसेच कराडजवळील कृष्णा-कोयना संगम हे धार्मिक दृष्ट्या प्रसिद्ध ठिकाण आहे.

कर्नाटकमध्ये सुमारे २६० किमी प्रवास करताना कृष्णेला घटप्रभा, मलप्रभा, भीमा आणि तुंगभद्रा या नद्या मिळतात. आलमट्टी, नारायणपूर, श्रीशैलम ही येथील प्रमुख धरणे आहेत. आंध्र प्रदेशातील ७२० किमी प्रवासात तिला मुसी, दिंडी, पालेरू अशा उपनद्या मिळतात. विजयवाडा येथे कृष्णा पूर्व घाटातील टेकड्यांमधून मार्ग काढून डेल्टामध्ये प्रवेश करते आणि अखेर तीन प्रवाहांतून बंगालच्या उपसागरात विलीन होते.

धार्मिक परंपरेतही कृष्णा नदीला विशेष स्थान आहे. दर बारा वर्षांनी गुरू ग्रह कन्या राशीत आल्यानंतर गंगा नदी कृष्णेला भेटते, अशी मान्यता आहे. या गंगामेळ्याला लाखो भाविकांची उपस्थिती लाभते. एकूणच कृष्णा ही नदी केवळ शेती व उद्योगांचे जीवनाधार नसून धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेशी घट्ट नाते सांगणारी जीवनदायिनी नदी आहे.

भारतातील गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा, कृष्णा, नर्मदा, गोदावरी आदी पवित्र व धार्मिकतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या नद्या आहेत. यातील ऐतिहासिक व धार्मिक दृष्टिकोनातून कृष्णा नदी ही भारतातील प्रमुख नद्यांपैकी एक असून, तिचा उगम पश्चिम घाटातील महाबळेश्वर येथे होतो. ही नदी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश व तेलंगणा या राज्यांमधून वाहत ती बंगालच्या उपसागराला मिळते. या नदीवरील ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे असणारे कराड हे ठिकाण कृष्णा व कोयना या दोन नद्यांच्या संगमासाठी प्रसिद्ध आहे. हिंदू धर्मात संगमस्थळांना विशेष महत्त्व असून, अशा ठिकाणी स्नान केल्याने पापमोचन होते, असा विश्वास आहे.

भारतीय धार्मिक परंपरेनुसार, जेव्हा गुरु ग्रह कन्या राशीत प्रवेश करतो, तेव्हा कन्यागत पर्वकाळास आरंभ होतो. या काळात कृष्णा नदीमध्ये गंगेचे आगमन होते, असे मानले जाते. यामुळे कृष्णा तीरावरील स्नान, गंगापूजन, श्राद्ध विधी आणि इतर धार्मिक कृतींना अत्यंत पवित्र आणि पुण्यप्रद असे स्थान प्राप्त होते. हजारो भाविक या पर्वकाळात कराडला भेट देतात. यामुळे या काळाचे आयोजन अत्यंत नियोजनबद्ध असणे गरजेचे ठरते. यादृष्टीने कराड कन्यागत उत्सव मंडळाची स्थापना करण्यात आली असून, या माध्यमातून कन्यागत पर्व काळातील विविध उत्सवांचे सुयोग्य नियोजन, भाविकांच्या सेवा सुविधा व नदी स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन यावरही भर देण्यात येणार आहे.

कृष्णा नदी ही धार्मिकतेसोबत कराड परिसरातील शेतीसाठीचा मुख्य जलस्रोत आहे. या नदीवर आधारित अनेक कालवे आणि सिंचन योजना आहेत, ज्यांमुळे परिसरातील अन्नधान्य उत्पादनाला गती मिळते. त्याचबरोबर कृष्णा नदीच्या काठावर अनेक मंदिरे, घाट, वसतीगृहे उभी राहिली आहेत. ती धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी प्रमुख स्थळं बनली आहेत. कृष्णा नदीवरील कृष्णामाई मंदिर, पावकेश्वर मंदिर, वीर मारुती, कमळेश्वर मंदिर, संत सखु मंदिर, कृष्णा नदीवरील अष्टतीर्थे आदींमुळे या नदीला मोठे धार्मिक महत्त्व प्राप्त होते.

कृष्णा नदीचे जेवढे धार्मिक महात्मे जपणे गरजेचे आहे, तेवढेच पर्यावरण जपणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या काळात वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि प्लास्टिक कचरा यांमुळे नद्यांचे प्रदूषण वाढले आहे. कृष्णा नदी याला अपवाद नाही. धार्मिक कार्यक्रमाच्या वेळी नदी व परिसर स्वच्छ ठेवण्याचे भान राहिले नाही तर, ही पवित्र जागा भविष्यात प्रदूषणाचे केंद्र बनू शकते. यासाठी कन्यागतसारखे उत्सव साजरे करताना पर्यावरणाचीही जाणीव असणे आवश्यक आहे. याबाबत जागृती करण्यासाठी कन्यागत उत्सव मंडळ व सर्व कराडकर नागरिकही सक्रिय राहणार आहेत. या संपूर्ण उत्सव काळात प्लास्टिकचा वापर टाळणे, बायोडिग्रेडेबल पूजेच्या वस्तूंचा वापर, नदीत पूजेचे साहित्य न टाकता त्यासाठी वेगळ्या व्यवस्था करणे, निर्माल्य कलश उभारणे, धार्मिक आणि पर्यावरणीय समतोल राखणे या दृष्टीने उत्सव मंडळ काम करणार आहे. यामध्ये नदी स्वच्छतेसाठी स्वयंसेवी संस्था व स्थानिक प्रशासनाचा सहभाग असले, ते अत्यंत गरजेचे आहे. पर्यावरण संतुलन साधण्यासाठी लोकसहभाग आणि जनजागृती फार महत्त्वाची आहे. शाळा, महाविद्यालये आणि समाजसंस्था यांच्या माध्यमातून पर्यावरण शिक्षण दिल्यास पुढील पिढ्यांपर्यंत ही जागरूकता पोहोचू शकते, या दृष्टीने कराडचा कन्यागत उत्सव आदर्शवत करण्यासाठी सर्वांनी आपापली योगदान देणे गरजेचे आहे.

कराडचा कन्यागत पर्वकाळ हा केवळ धार्मिक उत्सव नाही, तर एक तो संस्कृती, निसर्ग आणि सामाजिक ऐक्याचा संगम आहे. कृष्णा नदी ही या साऱ्या प्रक्रियेचा केंद्रबिंदू असून, तिचे संवर्धन आणि शुद्धीकरण आपली जबाबदारी आहे. कन्यागतसारख्या पवित्र सणाच्या निमित्ताने आपण नद्यांची आणि पर्यावरणाची जपणूक केली, तर धर्म,



संस्कृती आणि पर्यावरण यांचा सन्मान राखत आपण एक आदर्श समाज उभा करू शकतो.

उत्सव मंडळाच्या संचालकांनी कन्यागत उत्सवासाठी कंबर कसली आहे व विविध क्षेत्रातील मान्यवरांचे व कार्यकर्त्यांचे सहकार्य या उत्सवासाठी अपेक्षित आहे. उत्सव मंडळामार्फत २०२७-२०२८ सालामध्ये कन्यागतात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये निरनिराळ्या ठिकाणच्या साधुसंतांचे आगमन कराड नगरीमध्ये होणार असून, त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी मंडळातर्फे करण्यात येणार आहे. तसेच विविध धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक उपक्रमही या काळात राबवण्यात येणार आहेत. या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कराडच्या स्थानिक संस्था व प्रशासनाने लक्षपूर्वक सहकार्य करण्याची नितांत आवश्यकता आहे. त्याचबरोबर विविध प्रकारच्या सुविधांमध्ये रस्ते, निवास व्यवस्था, कराडच्या घाटांची दुरुस्ती, कराडला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त व्हावा, तसेच कृष्णा-कोयनेच्या अद्वितीय प्रीतीसंगमाला जीएसआय मानांकन मिळावे, धार्मिक विधीन करता सुविधा शेड उपलब्ध व्हावेत, भाविकांसाठी भक्त निवासाची निर्मिती व्हावी व कराडला असणाऱ्या अष्टतीर्थांवर तीर्थकुंडांची निर्मिती व्हावी आणि विविध विकासकामे व्हावीत, अशी अपेक्षा या निमित्ताने आम्ही व्यक्त करत आहोत. कराड कन्यागत मंडळाच्या संचालकांनी कन्यागत उत्सवासाठी कंबर कसली असून, विविध क्षेत्रातील मान्यवरांचे व कार्यकर्त्यांचे सहकार्य या उत्सवासाठी अपेक्षित आहे.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# ग्रामसभेत रोजगार हमी योजनेच्या लाभार्थ्यांवरून वादावादी

**सातारा/प्रतिनिधी:** कोरेगाव तालुक्यातील नायगाव येथे सकाळी झालेल्या ग्रामसभेत रोजगार हमी योजनेच्या लाभार्थ्यांची नावे व मजुरीच्या वाटपाच्या मुद्द्यावरून गोंधळ उडाला. चर्चेच्या दरम्यान अचानक वाद वाढताच मारामारी करण्यात आली.

नायगावच्या (ता कोरेगाव) ग्रामपंचायत सभागृहात सरपंच नितीन धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली रोजगार हमी योजनेच्या लाभार्थ्यांची नावे व मजुरीवाटपाच्या मंजुरी बाबत बैठक सुरू होती. यावेळी लाभार्थ्यांच्या गावात बाबत माहिती विचारली असता गावातील काही लोकांनी त्यास विरोध केला. त्यातून गोंधळ वाढत गेला आणि त्यानंतर रामखेडे मारामारी झाली.

त्यानंतर ग्रामसभेत काही लाभार्थ्यांनी रोजगार हमी योजनेत अन्याय झाल्याची तक्रार मांडली. या मुद्द्यावरून वादावादी वाढली. त्यामुळे काही वे वेळ ग्रामसभेचे वातावरण तणावपूर्ण झाले.

घटनेनंतर ग्रामस्थांनी मध्यस्थी करून परिस्थिती शांत केली. याप्रकरणी पोलिस ठाण्यात कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही. मात्र, रोजगार हमी योजनेत पारदर्शकता राखावी व सर्व पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळावा, अशी ग्रामस्थांची मागणी पुढे आली आहे.


कोरेगाव तालुक्यातील नायगाव येथील ग्रामसभेमध्ये वादावादी आणि झालेला गोंधळ

# मराठा आंदोलनकर्त्यांसाठी कराडकरांनी दिल्या २५ हजारांवर भाकऱ्या

## मुंबईला जेवणाचे साहित्य, पाण्याच्या बाटल्या रवाना

**कराड/प्रतिनिधी : -** मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील हे मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणास बसले आहेत. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत असला तरी, आंदोलनकर्त्यांना जेवण व पाण्याची मोठी गैरसोय जाणवत होती. या परिस्थितीची दखल घेत कराड शहरातील मराठा समाज समन्वयकांनी तातडीने मदतीचे आवाहन केले.

या आवाहनाला कराडकरांसह तालुक्यातील गावोगावातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातील दत्त चौकात मराठा समाज बांधवांनी भाकरी-चपात्या, पाण्याच्या बाटल्या, पत्रावळ्या, द्रोण व जेवणासाठी लागणारे अन्य साहित्य मोठ्या प्रमाणात जमा केले. अल्पावधीतच तब्बल २५ हजारांवर भाकरी-चपात्या, शेकडो पाण्याच्या बाटल्या व विविध साहित्य जमा झाले. शनिवारी रात्री उशिरा हे साहित्य विशेष वाहनांमधून मुंबईकडे रवाना करण्यात आले.

विशेष म्हणजे, नारायणवाडी येथील हणुमान गणेश मंडळाने आपला महाप्रसाद रद्द करून ते सर्व साहित्य आंदोलनकर्त्यांना देण्याचा निर्णय घेतला. याशिवाय कराड शहराबरोबरच ग्रामीण भागातील महिला-पुरुषांनी घरी तयार केलेल्या भाकऱ्या, चपात्या, भाजी, द्रोण व पत्रावळ्या आणून आंदोलनासाठी पाठिंबा नोंदवला.

फक्त मराठा समाजच नव्हे तर मुस्लीम समाजासह इतर समाजातील बांधवांनीही या उपक्रमात सहभाग घेत, आंदोलनकर्त्यांना अन्न-पाण्याची मदत केली. समाजातील ऐक्य आणि परस्पर सहकार्याचे दर्शन यावेळी घडले.

या उपक्रमामुळे मुंबईतील आंदोलनकर्त्यांची अन्न-पाण्याची तातडीची गरज भागणार असून, कराडकरांचा हा हातभार आंदोलनाला बळ देणारा ठरेल, असा विश्वास समन्वयकांनी व्यक्त केला.



# मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनमुळे गुन्हेगारी तपास वैज्ञानिक पध्दतीने

## पालकमंत्री: मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन व दोन आयसर बसचे लोकार्पण

**सांगली / प्रतिनिधी:** गुन्ह्यांचा छडा लावून शिक्षेचे प्रमाण वाढवण्यासाठी पोलीस दलाला अद्ययावत तंत्रज्ञानाने युक्त साधनसामग्री देण्याची कार्यवाही सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून सांगली पोलीस दलास अद्ययावत मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन व त्यासोबत प्रशिक्षित मनुष्यबळ दिले आहे. यामुळे गुन्हेगारी तपास वैज्ञानिक पध्दतीने व अधिक सक्षमतेने करण्याच्या दिशेने सांगली जिल्हा पोलीस दलाला मोठी ताकद प्राप्त झाली आहे, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे केले.

पोलीस दलास प्राप्त मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन व दोन आयसर बसचे लोकार्पण पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात आयोजित या कार्यक्रमास आमदार सुधीर गाडगीळ, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, अपर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सांगली विमला एम., उपविभागीय पोलीस अधिकारी मिरज प्रणिल गिल्डा, पोलीस उपअधीक्षक प्रभाकर मोरे, पोलीस उपअधीक्षक (गृह) अरूण सुगावकर, पालकमंत्री विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव उपस्थित होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, पोलीस विभागाची वाहतूक व्यवस्था चांगली होण्यासाठी दोन अद्ययावत बसेस सांगली पोलीस दलाच्या ताफ्यात आल्या आहेत. गुन्ह्याचा छडा लावण्यासाठी घटनास्थळावरून अनेक नमुने घ्यावे लागतात. त्यासाठी फॉरेन्सिक व्हॅन व प्रशिक्षित मनुष्यबळ दिले आहे. तसेच, या व्हॅनमध्ये सर्व गोष्टी अद्ययावत आहेत. अमली पदार्थ सापडले तर त्याचे वेगवेगळे प्रकार तपासण्यासाठी त्यामध्ये किट आहे. तसेच, सीसीटीव्ही असल्यामुळे गुन्ह्याच्या ठिकाणी नमुने घेताना त्याचे व्हीडिओ रेकॉर्डिंग करता येते. या अद्ययावत साधने व सुविधांमुळे गुन्हा घडल्यानंतर आरोपपत्र लवकर तयार होऊन प्रकरण लवकर निकाली लागून शिक्षा होण्याचे प्रमाण वाढेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनमध्ये असणारे विविध किट, त्याचा उपयोग याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी, पोलीस अधीक्षक संदीप घुगे व व्हॅनसाठी नियुक्त प्रशिक्षित स्टाफ यांच्याकडून सविस्तर माहिती जाणून घेतली. यावेळी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश शिंदे, पोलीस निरीक्षक सुधीर भालेराव, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक मुकुंद कुलकर्णी, पोलीस निरीक्षक भैरु तळेकर व सहायक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल कदम, राखीव पोलीस निरीक्षक अलदर, अंगुलीमुद्रा विभागाकडील सहायक पोलीस निरीक्षक प्रियांका संकपाळ तसेच पोलीस विभागाचे अधिकारी, अंमलदार उपस्थित होते.



# सुरूर ते कुंभरोशी रस्त्याच्या कामाची गती वाढवा

## मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्या सूचना, रस्त्याची केली पाहणी

**वाई/प्रतिनिधी : -** वाई, पाचगणी व महाबळेश्वर येथील पर्यटनवाढीच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या सुरूर ते कुंभरोशी या महामार्गाच्या कामाची गती वाढवा अशा सूचना मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिल्या.

वाई ते सुरूर दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या चौपदरीकरण कामाची मदत व पुनरसन मंत्री मकरंद पाटील यांनी पाहणी केली. यावेळी एमएसआयडीसीचे कार्यकारी अभियंता नायकवडी, बांधकाम विभागाचे उपअभियंता गोंजरी, किसनवीर कारखान्याचे संचालक शशिकांत पिसाळ, शशिकांत पवार, सत्यजीत वीर, महादेव म्हस्कर, अशोक मांढरे व राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले, मुंबई - पुणे येथून पाचगणी, महाबळेश्वर व वाईला लाखो पर्यटक भेट देण्यासाठी देतात. त्यांच्या सुविधेसाठी व दळण-वळण वेगाने होण्यासाठी महत्वाचा ठरणारा हॅम -२ योजने अंतर्गत सुरू असलेला हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, सुरूर - वाई - पाचगणी - महाबळेश्वर - कुंभरोशी असा साधारण ५९ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पाचा अंदाजे खर्च २९३ कोटी आहे. या मार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर पर्यटन व्यवसाय आणखी वाढेल, स्थानिकांना रोजगार मिळेल. वाई ते सुरूर रस्त्याच्या - चौपदरीकरणाचे काम सध्या सुरू आहे. हे काम अतिशय संथ गतीने चालू असल्याने या परिसरातील व्यावसायिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या रस्त्याचे काम गतीने व्हावे, अशा सूचना दिल्या.



## जवान आदित्य थोरात अनंतात विलीन

पान १ वरून या प्रसंगी लष्करी अधिकारी, माजी सैनिक, स्थानिक नेते, ग्रामस्थ आणि मान्यवर उपस्थित राहून त्यांनी पुष्पचक्र अर्पण करून आदित्य यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. आदित्य थोरात यांच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ व एक बहिण असा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने घरावर दु:खाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण गाव कुटुंबाच्या दु:खात सहभागी झाला आहे. कालवडे या गावाने एक शूर,धाडसी व कर्तव्यनिष्ठ सैनिक गमावला असून या शोकांत प्रसंगामुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

# सरताळे येथे कुंटणखाना चालवणाऱ्या दोघांवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**सातारा/प्रतिनिधी:** सरताळे तालुका जावळी येथे राज इंडियन हॉटेल मध्ये कुट णखाना चालवणाऱ्या तीन इसमांच्या विरोधात मेढा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे या कारवाईत मानवी अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ कलम चार व पाच नुसार गुन्हा नोंद करून चार पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे

सरताळे गावातील सचिन तुकाराम भिसे सुरज नंदकुमार भिसे या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे या प्रकरणातील उडपी कर्नाटक येथील रावेत शेट्टी हा मात्र फरार झाला आहे .अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉक्टर वैशाली कडूकर यांना आपल्या बातमीदारामार्फत सरताळे येथील राज इंडियन हॉटेलमध्ये वेश्या गमना करता मुली आणल्या जात आहेत अशी माहिती मिळाली होती त्यावेळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने येथे छापा मारून कारवाई केली त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला .या संदर्भात पुढील कारवाई सुरू आहे

या कारवाईत महिला पोलीस उपनिरीक्षक श्वेता पाटील सहायक पोलीस निरीक्षक सुधीर पाटील मोनाली निकम शिवाजी गुरव विक्रम पिसाळ मेढा पोलीस ठाण्याचे जनार्दन गायकवाड रफिक शेख श्रवण राठोड नितीन कदम यांनी कारवाईत भाग घेतला होता .पोलीस अधीक्षक तुषार दोषी मी या पथकाचे कारवाईबद्दल अभिनंदन केले आहे

# पाचवडपुलाच्या भूसंपादनाचा प्रश्न मार्गी

## राष्ट्रवादीचे नेते ॲड. उदयसिंह पाटील यांच्या प्रयत्नांना यश

**कराड/प्रतिनिधी : -** मौजे नांदलापूर, नारायणवाडी, पाचवड, वस्ती (कापील) कोडोली, ता. कराड येथील कृष्णा नदीवरील मोठ्या पुलाचे बांधकामाकरिता जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने घेण्यात येणा-या प्रस्तावमधील जमिनीच्या मोबदल्यासाठी आर्थिक तरतूद होणे कामी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचेकडे रयत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन



ड उदयसिंह पाटील (उंडाळकर) यांनी राष्ट्रवादी पक्षप्रवेशावेळी मागणी केली होती. त्यास यश येऊन ४ कोटी निधी उपलब्ध झाल्याने पुलाच्या भूसंपादनाचा प्रश्न मार्गी लागला आहे.

कराड दक्षिण विधानसभा मतदार संघातील कराड दक्षिणचा पश्चिम डोंगराळ भाग व पूर्वेकडील कृष्णा काठ जोडण्यासाठी माजी मंत्री लोकनेते स्व. विलासकाका पाटील यांनी पाचवड येथील कृष्णा नदीवरील पुलाची संकल्पना मांडून पुलाची मागणी केली होती. त्यानुसार या पुलाचे काम प्रगतीत आहे. एकंदर ४ पिलरचे बांधकाम पूर्ण झाले असून मौजे कोडोली, ता. कराड बाजूकडे ८४० मीटर लांबीचा जोड रस्ता नव्याने तयार करावयाचा आहे तर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ जोडणारा अस्तित्वातील ६५० मी. लांबीचा रस्ता १२ मीटर रुंदीने करण्यासाठी भू संपादन प्रस्ताव तयार केलेला आहे. यामध्ये मौजे नांदलापूर, कोडोली, नारायणवाडी, पाचवड (वस्ती) (कापील) या गावातील एकदर २७ गट हद्दीतून हे जोड रस्ते जात आहेत. या भू संपादन प्रस्तावाची एकूण किंमत ४ कोटी इतकी आहे.

सदर रककम बाधित शेतकऱ्यांना अदा करण्यासाठी ४ कोटी इतक्या रककमेची शासनाकडे मागणी करण्यात आली होती. ही रक्कम प्राप्त झाल्याने संबधित बाधित शेतकऱ्यांना तत्काळ या रकमेचे वाटप करण्यात येवून उर्वरित काम सुरु करून ते लवकर पूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त करणेत येत आहे. शासनाकडून हा निधी उपलब्ध झाल्याने शासनाचे ड. उदयसिंह पाटील यांनी आभार मानले आहेत.

# औषधांच्या गोळ्यांतून साकारलेले बाप्पा

## आरोग्य,कला आणि श्रद्धेचा अनोखा संगम;डॉ.राजेंद्र कंटक यांच्याकडून त्रिसूत्रीला नवा आयाम

**कराड/राजेंद्र मोहिते : -** गणेशोत्सव हा भक्ती, श्रद्धा आणि सर्जनशीलतेचा महापर्व. यंदा कराडचे डॉ. राजेंद्र कंटक यांनी या त्रिसूत्रीला नवा आयाम दिला आहे. वैद्यकीय सेवा, कला आणि श्रद्धा या तिन्ही क्षेत्रांचा सुंदर संगम घडवित त्यांनी औषधांच्या गोळ्यांपासून गणेशमूर्तीची अप्रतिम निर्मिती केली आहे.

### श्रद्धेची अभिव्यक्ती

औषधांच्या गोळ्यांतून उभा ठाकलेला गणपती केवळ कलेचा नमुना नाही, तर तो श्रद्धेची सखोल अभिव्यक्ती आहे. भक्तीची ही सर्जनशील भाषा पाहणाऱ्यांच्या मनात आदरभाव जागवते. आरोग्य, कला आणि श्रद्धा या तिन्ही गोष्टींचा सुरेख संगम साधणाऱ्या या कलाकृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### कलेची साधना

डॉ. कंटक हे नाव चित्रकलेच्या क्षेत्रात नवे प्रयोग करणारे म्हणून आधीच प्रसिद्ध आहे. त्यांच्या कलेतून विज्ञान आणि संवेदनशीलता हातात हात घालून दिसते. यापूर्वी त्यांनी आपल्या बागेत पडलेल्या आवळ्यांच्या फळांमधून तब्बल ६ फूट ह्व २ फूट उंचीचे विठ्ठलरूप घडवून भक्तांना आश्चर्यचकित केले होते. आता गणेशोत्सवात त्यांनी व्यवसायाशी नाते जोडून ‘गोळ्यांतून बाप्पा’ प्रकट केला आहे. मूर्तीभोवती त्यांनी रेखाटलेली बालगणेशाची मोहक चित्रे रसिकांचे मन वेधून घेत आहेत.

औषधांच्या गोळ्यांचा वापर करून सजविलेला गणपती हा केवळ कलाकृती नसून आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करणारा संदेश आहे. शरीराचे स्वास्थ्य हीच खरी पूजा आणि निरोगी समाज हीच खरी प्रगती या संकल्पनेला डॉ. कंटक यांनी आपल्या कलेतून अधोरेखित केले आहे.

औषधांतून घडविलेला गणपती हा कराडच्या गणेशोत्सवात आरोग्य, कला आणि श्रद्धेचा प्रकाश पसरवणारा नवा दीप ठरला आहे.

### जगभरातील मान्यता

डॉ. कंटक यांचे नाव वर्ल्ड, लिम्का आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्‌समध्ये नोंदले गेले असून त्यांनी फक्त पेन्सिलच्या सहाय्याने ३५,००० हून अधिक चित्रे रेखाटली आहेत. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्यावर काढलेल्या ७५० चित्रांनी रसिकांना भावविवश केले आहे. त्यांच्या या कामगिरीची दखल आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्‌सनेही घेतली आहे.



# वाईच्या डिबीची मोबाईल चोरट्यांवर करडी नजर

## ४ लाख २० हजारांचे मोबाईल केले परत

**वाई/प्रतिनिधी:** महाराष्ट्र तसेच इतर राज्यातून चोरीस गेलेले व गहाळ झालेले एकूण २० मोबाईल व १ टॅब असे एकुण ४ लाख २० हजार रुपये किंमतीचे मुद्देमालाचा शोध घेऊन तक्रारदार यांना वाई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जितेंद्र शहाणे यांचे हस्ते परत केले.

वाई शहर हे सातारा जिल्ह्यातील मुख्य बाजारपेठ असुन, पोलीस ठाणे हद्दीत मोबाईल गहाळ होण्याचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन सदर मोबाईल तक्रारीबाबत गांभीर्याने लक्ष देऊन जास्तीत जास्त मोबाईल परत करण्याबाबत वरिष्ठ यांनी आदेशित केले होते. त्याअनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस उपनिरीक्षक सुधीर वाळुंज व पो.कॉ विशाल शिंदे यांस योग्य ते मार्गदर्शन करुन सदरचे गहाळ झालेले मोबाईलचा तात्काळ छडा लावण्याबाबत आदेश केला होता. त्यानुसार तात्काळ कारवाई करीता महाराष्ट्र तसेच इतर विविध राज्यातुन गुन्हे प्रकटीकरण शाखेने एकुण २० मोबाईल १ टॅब परत मिळवुन तक्रारदार यांना पोलीस निरीक्षक वाई पोलीस ठाणे यांचे हस्ते परत केले.

गुन्हेप्रकटीकरण शाखेने महाराष्ट्र राज्याचे विविध भागामधुन तसेच इतर राज्यातुन मोबाईल परत मिळवत गहाळ झालेले मोबाईल तक्रारदार यांना परत केल्याने नागरिकांमध्ये पोलीस प्रशासनाबाबत प्रशंसनीय भावना व्यक्त करण्यात येत आहे. जानेवारी २०२४ पासुन एकुण ३०० विविध कंपन्यांचे नामांकित मोबाईल वाई गुन्हे प्रकटीकरण शाखेने तक्रारदार यांना परत केले आहेत.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक तुषार दोषी, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती वैशाली कडुकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळासाहेब भालचिम, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जितेंद्र शहाणे तपासपथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सुधीर वाळुंज, पो.कॉ विशाल शिंदे, पो.कॉ हेमंत शिंदे, पो.कॉ नितीन कदम, पो.कॉ श्रावण नितीन कदम, पो.कॉ श्रावण राठोड, प्रसाद दुदुस्कर, पो.कॉ महेश पवार (सायबर) यांच्या पथकाने केली आहे. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



# रेवण घाटात काळ्या बिबट्याचे दर्शन

## कुत्र्यावर हल्ला करून डोंगर परिसरात पसार

**विटा/प्रतिनिधी : -** खानापूर तालुक्यातील रेवणगाव घाटात भर दुपारी काळ्या बिबट्याचे त्याठिकाणी काम करणाऱ्या ट्रॅक्टर कामगारांना दर्शन झाले. यावेळी सदर बिबट्याने कुत्र्यावर हल्ला करून त्याला ठार केले. तसेच कुत्र्याला डोंगर परिसरात घेऊन गेला. याबाबतची माहिती घटनास्थळी असणाऱ्या नागरिकांनी वन विभागाला दिली. तर काहींनी या काळ्या बिबट्याचा व्हिडिओही व्हायरल केला.

याबाबतची माहिती मिळताच वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन ठशांची पाहणी केली. त्यानंतर वनविभाग अधिकारी यांनी रात्रीच्या वेळेत शेतामध्ये कोणीही जाऊ नये, नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन केले आहे. रेवणगाव रेवणसिद्ध घाटात हा बिबट्या वावरत असल्याचे समजते.

सदर बिबट्याला पकडण्यासाठी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी पूर्ण तयारी दर्शवली आहे. सध्या तरी या बिबट्याने एका कुत्र्यावर हल्ला केला असल्याची माहिती मिळाली आहे.



दै.प्रीतिसंगम दि. ३१.०८.२०२४

NAME CHANGS

MY OLD NAME WAS BABASAHEB MAGBUL MULANI SHAIKH AND MY NEW NAME IS BABASAHEB MAGBUL SHAIKH

# गणेशवाडीतील गणेशोत्सवाला स्वांतत्र्यपुर्व ऐतिहासिक वारसा

**शिरोळ/संदिप आडसुळ:** गणेशवाडी (ता.शिरोळ) येथील गणेशोत्सवाला स्वांतत्र्यपुर्व, ऐतिहासिक वारसा लाभला आहे. येथे सन १९२३ मध्ये स्थापन झालेल्या श्री सार्वजनिक गणेशोस्तव संस्थेला यावर्षी १०२ पुर्ण झाली आहेत. आजतागायत येथे पारंपारिक पध्दतीनेच गणेशोत्सव साजरा केला जातो. सन १९१६ चा काळ.सारा देश स्वांतत्र्यांच्या चळवळीने पेटुन उठला होता. अशावेळी देव,देश अन धर्माची शिकवण देण्यासाठी गणेशवाडीत लोकसेवा संघ वाचनालय व व्यायामशाळा स्थापन झाली. लोकमान्य टिळक कर्नाटक दौर्यावर असताना कर्नाटक सिंह गंगाधर देशपांडे यांच्या प्रयत्नाने त्यांना संघाने गणेशवाडीत आणले.सन १९१७ मध्ये येथे टिळकांची मोठी सभा झाली.



अदांजे तीन हजाराहुन अधिक लोक या सभेस उपस्थित होते. यावेळी गणेशवाडीकरांनी स्वांतत्र्य चळवळीस १५० रुपयाची देणगीही दिली. या भेटीत लोकमान्य टिळकांनी लोकसेवासंघास गणेशोत्सवाची प्रेरणा दिली. यावेळी संघाचे अध्यक्ष असलेले श्रीपाद मास्तर मराठे यांच्या पुढाकाराने वाचनालयाच्या कार्यालयात गणेशवाडीचा पहिला गणेशोत्सव साजरा झाला. तीन- चार वर्षे संघामध्ये गणेशोत्सव साजरा झाला. सन १९२३ मध्ये गणेशवाडीत याला व्यापक स्वरुप प्राप्त व्हावे,स्वातंत्र्य चळवळीला बळ मिळावे, स्वांतत्र्यांच्या प्रेरणेने गावातील तरुण एकत्र यावेत यासाठी हा उत्सव सार्वजनिक केला.

सन १९२३ मध्ये गावातील मुख्य चौकात गणेशोत्सव हा सार्वजनिक गणेशोत्सव संस्थेच्या नावे सुरु करण्यात आला.अल्पावधीतच या उत्सवास भव्य स्वरुप प्राप्त झाले. सारा गाव एक झाला. लेझीम, सभा, मेळावे, नाटक यांनी सारा गाव दुमदुमुन गेला.१९५० ते १९८० च्या दशकात विविध सामाजिक,कौटुबिंक नाटकांनी हा उत्सव वेगळ्याच उत्तुंग अशा ऊंचीवर नेऊन ठेवला. गणेशवाडीच्या सार्वजनिक गणेशोत्सव मेळा पथकांनी पुण्यातील उत्सवही गाजवला.

अँड.राघवेंद्र गोरवाडे, आप्पासाहेब गावडे, चिंतामणी भट आणि संस्थेचे सर्व कार्यकर्ते त्याच वेळच्या प्रेरणेने राष्ट्रीय सेवेची भावना जोपासत त्याच उत्साहात आजही पारंपारिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करीत आहेत.पहिला गणेशोत्सव ज्या मखरात साजरा झाला. ते मखर लोकसेवा संघाने आजही सुस्थितीत जतन करुन ठेवले आहे. लोकसेवा संघ आजही सर्व परपंरा, गावातील सांस्कृतिक , राष्ट्रीय सेवेचा, राष्ट्र भक्तीचा वारसा जपत गणेशोत्सव साजरा करतो. याचा सार्थ अभिमान गावास व संस्थेस आहे. प्रत्येक घराघरात, प्रत्येक व्यक्तीला देव, देश अन धर्माची शिकवण देण्याचे कार्य संस्थेच्या माध्यमातुन करण्यात आले आहे.हाच वारसा जपत आजही अनेक संस्था ठामपणे उभ्या आहेत.गणेशोत्सवाच्या निमित्ताने गावातील सुमारे २५ गणेश मंडळे स्वागत कमानीच्या माध्यमातुन विविध सामाजिक संदेश देत देव, देश आणि धर्मसेवेचे कार्य निष्ठेने बजावत आहेत.

सन १९२३ मध्ये स्थापना झालेल्या श्री सार्वजनिक गणेशोत्सव संस्थेला सन २०२३ मध्ये १०० वर्षे पुर्ण झाली. या शताब्दी महोत्सवानिमित्त संस्थेच्या वतीने विविध सामाजिक,धार्मिक कार्यक्रमासह महिलासाठी विशेष कार्यक्रम, मान्यवरांचे किर्तन, प्रबोधनात्मक व्याख्यान, भक्तीगीते, महाप्रसाद अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

गणेशोत्सवानिमित्त ही संस्था कोणत्याही स्वरुपाची गाववर्गणी गोळा करीत नाही.जे काही भक्त,भाविक स्वइच्छेने देणगी देतात त्यामधुनच गणेशोत्सव भक्तीमय वातावरणात,उत्साहाने साजरा केला जातो. संस्थेच्या श्रींची मुर्ती ही पर्यावरणपुरक शाडुच्या मातीपासुन बनविलेली असते. श्रींचे आगमन व विसर्जन हे पालखीतुनच केले जाते.यामुळे पारंपारिकतेचा वारसा आजही जपला जात आहे.

- श्री.बळवंत गोरवाडे